महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


पत्र क्र./पुविमं/ओ-१/खा.वि./ 5341
पुणे-४११००५
दि. ०१/०९/२०२३
04

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च -२०२४ करिता खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज स्विकारण्याबाबत.

संदर्भ; राज्यमंडळाचे पत्र जा.क्र.रा.मं/परीक्षा-३/३४६६, दि. ०८/०८/२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च -२०२४ करिता खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांकडून जमा करून घेण्यास काही शाळांकडून अडवणूक करण्यात येते, शाळेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय सदर शाळा का निवडली ? शाळेत नोंदणी अर्ज जमा करण्यास गेले असता विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य वागणूक मिळत नाही इ. तक्रारी विभागीय मंडळास प्राप्त झाल्या आहेत.

यानुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पुन:श्च कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वी संपर्क केंद्रांमार्फत नाव नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत होती. मात्र प्रचलित पद्धतीमधील अडचणींचा, त्रुटींचा विचार करून सदरची योजना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभदायी, सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी याद्दष्टीने यापूर्वीची संपर्क केंद्र शाळेमार्फत नाव नोंदणी अर्ज स्विकारण्याची प्रचलित पद्धत रद्द करून इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचे ज्या पद्धतीने सर्व कनिष्ठ महाविद्यालयातून नाव नोंदणी अर्ज स्विकारण्यात येतात त्याप्रमाणेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेच्या खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांमधून स्विकारण्याची कार्यपद्धती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून सुरू करण्यात येत आहे. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या संकेत स्थळावर **http://mahahsscboard.in** प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रथम त्याचे पालन करण्यात यावे तद्नंतर त्यामधील अधिक माहितीसाठी सर्व माध्यमिक शाळांनी या विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

त्यामुळे खाजगी विद्यार्थी म्हणून नाव नोंदणी अर्ज सादर करीत असताना विद्यार्थ्यांना आवश्यक समुपदेशन करावे, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात यावे. मंडळाच्या परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. आपण सदर अर्ज न स्विकारल्यास, विद्यार्थ्यांना योग्य ते सहकार्य न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस आपणास जबाबदार ठरविण्यात येईल व आपल्या शाळेवर मंडळाच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तरी हे पत्र अंतिम समजून कार्यवाही करण्यात यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.